नियमीत फौजदारी खटला क्र. **१७०/२०२५**
निशाणी क्र. **१३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव	:	**सागर सुर्यकांत भोईर**
वय सुमारे	:	३३ वर्षे, व्यवसाय : मजूरी
निवासस्थान	:	मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड

<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u> :

०१. दि. २२/०५/२०२५ रोजी मी रस्त्याने चाललो होतो तेव्हा पोलीसांनी मला झिराड नाक्यावर थांबवले. पोलीसांनी लॅपटॉप आणले होते. झिराड येथे झिराडकरांच्या घरासमोर पंचनामा चालू होता. घटनास्थळ संगिता मंडळ यांनी दाखवले. पोलीसांनी पंचनामा केला. घटनास्थळाच्या आजूबाजूला झिराडकरांची घरे होती व आंब्याची झाडे होती. पंचनामा अर्धा तास चालू होता. पंचनामा मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. २ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. महेश बैकर यांचेमार्फत</u> :

०२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनामा घटनास्थळी वाचण्यासाठी दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात काय लिहीले होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सही करण्यापूर्वी पंचनामा वाचला नव्हता. मला ११:३० वाजता पंचनाम्यासाठी बोलावले होते. पंचनामा किती

वाजता चालू झाला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा परिसर माझ्या परिचयाचा आहे. घटनास्थळाच्या चतु:सीमा मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी फिर्यादी हजर होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

०३. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझ्या परिचयाची आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी आमच्या गावात भाड्याने राहते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझ्या परिचयाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचा भाऊ माझ्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर सही केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. (**एम्. बी. अत्तार**)

दिनांक : **१७/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.